शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र ८८५८ /खाप्राशा/०८ - ०९
दिनांक — 17 FEB 2009

अध्यक्ष,
नामदेवराव मोहोळ प्रतिष्ठानची प्राथमिक शाळा,
नवी विठ्ठलवाडी,
सिंहगड रोड, पुणे.

विषय : सन २००८ - ०९ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १) शालेय शिक्षण विभागाकडील क्र. पी एल एस /२००४ / (२६०)/ २००४/प्रशि-२
दि. २२.६.०४
२) शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमशा/ २००७ / (९८६/०७) दि. २९.१०.०७
३) शिक्षण उपसंचालकांकडील जाक्र. प्रा/प्राशि-२ /खाप्रशा /नूमा/२९२/९६
दि. ५.०२.०९ चे पत्र.

मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. २८५ दि. ४.२.२००९ नुसार नामदेवराव मोहोळ प्रतिष्ठानची प्राथमिक शाळा, नवी विठ्ठलवाडी, सिंहगड रोड, पुणे या शाळेस सन २००८ - ०९ या शैक्षणिक वर्षात इ. १ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर शाळा सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे १ यांचेकडील दि. ५.२.२००९ चे पत्रातील अटींचे पालन संस्थने करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत :-
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

C:\Master\ShrikADARE.doc583

TRUE COPY
मुख्याध्यापक

जा क्र प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुणे
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 17 JUL 2004

प्रति,

शिक्षण प्रमुख
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे

<u>विषय</u> : सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी).

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलएस-२००४/(२६०/२००४)/प्राशि-३, दिनांक २२ जून, २००४

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण प... | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान सर्वांपेठ, पुणे-३० | नवी विठ्ठलवाडी, पुणे | इंग्रजी | १ ली |

कायम विनाअनुदानीत

त्यामुळे या संस्थाकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा
आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१ संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२ संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही
४ संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५ संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅंपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅंपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षाच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जांचा विचार करता येणार नाही
१४ संस्थेकडून रु. २०/- च्या स्टॅंपच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यार तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता )

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत अतिरिक्त सविनय सादर.
१. मा. सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, ... पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव, नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान सर्वांपेठ, पुणे-३०

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.१३२/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मां राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ ऑक्टोबर, २०१६

संदर्भ -

शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्रमांक-अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/४७२९, दिनांक ११.८.२०१६

<u>प्रस्तावना</u> -

१. उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० या संस्थेच्या २ शाळांना महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन शाळा स्थापन करण्यास अथवा विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रामधील २ शाळा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळांनी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील. तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रामधील संबधित शाळांच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शा[ळा] सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सीबीएसई मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांची राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा

परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक),पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

Siddharth Mohol Memorial School
Kirkatwadi, Near Grampanchayat Office,
Sinhagad Road, Pune-24
Principal

Siddharth Mohol Memorial School
Kirkatwadi, Near Grampanchayat Office
Sinhagad Road, Pune-24.
Principal

SMMS
Kirkatwadi, Near Grampanchayat Office
Sinhagad Road, Pune-24
Principal

राष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन). अधिनियम,2012 अंतर्गत कलम 7(1) अन्वये नवीन शाळा स्थापन
रणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या
नावांची यादी

शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-1016/प्र.क्र.132/एसएम-2, दिनांक 17 ऑक्टोबर,2016 चे सहपत्र

| क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | नवीन शाळा /दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० | प्राथमिक विद्यालय, घोटावडे फाटा, ता.मुळशी, जि.पुणे | दर्जावाढ | प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | राज्य मंडळ | इंग्रजी |
| | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० | प्राथमिक विद्यालय, किरकटवाडी, ता.हवेली, जि.पुणे | दर्जावाढ | प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | राज्य मंडळ | इंग्रजी |

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- प्राशास्थ ३२१५/प्र.क्र.५६/एसएम-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- ३० मार्च, २०१५

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,
पुणे

विषय:-प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत
नामदेवरावं मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी, ता.हवेली, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळेचे किरकटवाडी ता.हवेली, जि.पुणे स्थलांतर करण्यास परवानगी मिळणेबाबत

संदर्भ : आपले क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१४-१५/४८०/८२
दि. ७ जानेवारी, २०१५ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी, ता.हवेली, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळेचे किरकटवाडी ता.हवेली, जि.पुणे येथे स्थलांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

१) स्थलांतरीत प्राथमिक शाळेची कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२) सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

३) स्थलांतरासाठी पालक-शिक्षक समिती यांची सहमती असावी व स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

४) शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.

५) स्थलांतरीत ठिकाणी प्राथमिक शाळेसाठी लागणारी आवश्यक जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील.

६) नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी, ता.हवेली, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रिय अधिकाऱ्यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे व तसे हमीपत्र संस्थेकडून रू.१००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करून घ्यावे.

७) स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

८) प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी शिक्षक अतिरिक्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील.

९) स्थलांतरीत प्राथमिक शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी देण्यात यावी.

१०) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजूरी तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

३. सदरहू संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास मंजूरी देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

स्वा.म.नानल

(स्वा.म.नानल)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

अध्यक्ष / सचिव, नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, १९८ शेंडकर बिल्डिंग, नवी पेठ, पुणे ४११ ०३०

# शिंक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१५ / ६५३८२/ ५५

दिनांक. 20 APR 2015

प्रति,

शिक्षण प्रमुख,

महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे

**विषय :- प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत ...**

नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी, ता. हवेली जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळेचे किरकटवाडी ता. हवेली जि. पुणे स्थलांतर करण्यास परवानगी मिळणेबाबत

**संदर्भ :- १)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र-माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२ दिनांक ३१ जुलै २०१३.**

२) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १११४/प्र.क्र.१३०/एसएम-१/मंत्रालय मुंबई-३२ दि ०५.६.१४

३) शिक्षण प्रमुख मनपा पुणे यांचे पत्र खाप्राशा/३३०४/२०१४-१५ दि. २५.०९.१४

४) या कार्यालयाचे पत्र दिनांक २५.११.२०१४

५) अध्यक्ष, नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान यांचे पत्र दि. १८.१२.२०१४

६) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/२०१४१५ /४८०/८२ दि.७.१.१५

७)मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र प्राशास्थ ३२१५/प्र.क्र.५६/एसएम-१मुंबई दि.३०.०३.२०१५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी ता. हवेली जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळेचे किरकटवाडी ता. हवेली जि. पुणे येथे स्थलांतर करण्यास खालील अटींच्या अधीन राहुन वरील संदर्भीय शासन पत्र क्रं. ७ अन्वये परवानगी देण्यात आलेली येत आहे.

१. स्थलांतरीत प्राथमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.
२. सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.
३. स्थलंतरासाठी पालक-शिक्षक समिती यांची सहमती असावी व स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर सामावुन घेणे आवश्यक राहील.
४. शासनाने वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमाचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.
५. स्थलंतरीत ठिकाणी प्राथमिक शाळेसाठी लागणारी आवश्यक जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील.
६. नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी, ता. हवेली जि. पुणे या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रिय अधिका-यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे व तसे हमीपत्र संस्थेकडून रु. १००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करुन घ्यावे.
७. स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी
८. प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी अतिरिक्त शिक्षक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील.
९. स्थलांतरीत शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजुरी देण्यात यावी.
१०. सदरहु स्थलांतरा संदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिका-याकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजुरी तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येईल.

सदरहु संस्थेच्या प्राथमिक शाळेस स्थलांतराची मंजुरी देण्याबाबत वरील संदर्भ क्रं. ७ अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास व या कार्यालयास कळविण्यात यावे.

(रामचंद्र जाधव)

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे-१

**प्रत :-**

१. शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, पुणे

२. नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान पुणे संचलित प्राथमिक विद्यालय, नवी विठ्ठलवाडी , पुणे

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंत चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/५५८/२०१६
पुणे दिनांक - २१ /१२/२०१६

प्रति,

अध्यक्ष, मुख्याध्यापक
नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान संचलित
इंग्लिश मेडीयम स्कुल, किरकटवाडी पुणे २४

**विषय:- शाळेच्या नावात बदल करणे बाबत.**

संदर्भ:- १) शासन पत्र क्रमांक एसएसएन-१०९६/७०८८/माशि-१ मंत्रालय मुंबई-३२ दि ३/१२/१९९८

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे -१ यांचे पत्र जाक्र/शिउस/प्राथ -द/२/नावात बदल/२०१५/४२८५/८६ दि २६/२/२०१५

३) आपले कार्यालयीन पत्र जाक्र दि १० / १० / २०१६

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. ३ नुसार शाळेच्या नावात बदल करणे बाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेलला आहे. प्रस्तावातील कागदपत्र विचारात घेवुन बदलाची नोंद या कार्यालयाच्या नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

| जुने नांव | नवीन नाव |
|---|---|
| इंग्लिश मेडीयम स्कुल किरकटवाडी सिंहगडरोड ता.हवेली जि.पुणे | सिध्दार्थ मोहोळ मेमोरियल स्कुल, किरकटवाडी, सिंहगडरोड ता.हवेली जि.पुणे. |

शिक्षणधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत - माहितीसाठी

१) मुख्याध्यापक इंग्लिश मेडीयम स्कुल किरकटवाडी, सिंहगडरोड, पुणे २४

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१) मा.शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग पुणे-१

२९२-९५

कायम विनाअनुदान तत्वावर
नूतनीकरणाने

जाक्र.प्राशि-३/खाप्राशा/नू.मा./पुवि/०८-०९
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 15 JAN 2009

प्रति
१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२) शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ,पुणे

विषय सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल-२००४/(२६०/२००४)/प्राशि-३, दिनांक २२ जून २००४
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमाशा-२००७/(९८६/०७) दिनांक ११ ऑक्टोबर २००७
३.आपले पत्र क्र. ६५७०/खाप्राशा/०८-०९ दिनांक २/१२/२००८

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु नकरता सदरची शाळा सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानुसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गाने शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण नवीपेठ,पुणे ३०. | नवी विठ्ठलवाडी,पुणे | पहिली | इंग्रजी | जून २००८ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा [illegible]

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विकासाठं स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ या पत्रान्वये नूतनीकरणाने शाळा परवानगी देवूनही शाळा सुरु न केल्यास भविष्यात सदर शाळेस कोणत्याही कारणास्तव नूतनीकरणाने परवानगी दिल जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी ती संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

(सु-ई६ एन.जे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१ मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
९. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
१०. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११. मा. सचिव/अध्यक्ष,
नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण नवीपेठ,पुणे ३०.

**Siddharth Mohol Memorial School**
Kirkatwadi, Near Grampanchayat Office,
Sinhagad Road, Pune-411 024.

Principal

॥ नहि ज्ञानेन् सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

# NAMDEORAO MOHOL EDUCATION AND SPORTS PRATISTHAN

Founder : Ashok Mohol (Sec. [illegible])

Office : 108, Shendkar Building, Navi Peth, Pune 411 030. Tel. : 91-20 24339452

Outward No. NMV/26/07.08 Date : २५/०६/२००७

प्रति,
मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे—४११००१

विषय— सन २००७—०८ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा विठ्ठलवाडी पुणे येथे सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम—इंग्रजी)

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळवित आहोत की, शैक्षणिक संस्थेने [illegible] प्राथमिक विद्यालय विठ्ठलवाडी पुणे जा.क्र. प्रा.शि/ख्रा प्रा.शा/ [illegible] मान्यता/पुर्के/ शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय [illegible] जुलै २००४ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. परंतु संस्थेला शाळा सुरु करण्यासाठी काही अडचणी निर्माण झाल्यामुळे त्या वर्षीस शाळा सुरु [illegible] सन २००७—०८ मध्ये (जून २००७ पासून) या शैक्षणिक वर्षात सुरु शाळा करणेसाठी नुतनीकरण (पुर्नमान्यता) प्रस्ताव सादर करीत आहोत. तरी नुतनीकरण मान्यता प्रस्तावास आवश्यक लागणारी कागदपत्रे सोबत जोडून पाठवित आहोत. इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करणेस माहे जून २००७ पासून परवानगी देण्यास विनंती.

आपला

अशोक मोहोळ
संस्थापक

नामदेवराव मो[illegible] क्रिडा प्रतिष्ठान
१९८, पांजये चौक, नवी पेठ, पुणे-३०.

सोबत:—

१. पुर्नमान्यता प्रस्ताव फाईल
   अ. संस्था ठराव / नोंदणी प्रमाणपत्र
   ब. इमारत जागा नकाशा व ७/१२ उतारा
   क. मान्यता पत्राची सत्यप्रत
   ड. सुविधा यादी
   इ. विद्यार्थी यादी
   ई. शिक्षकांची यादी
   फ. संस्था बँक बॅलन्स प्रत इत्यादी

प्रत —
1) मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि. प. पुणे.
2) मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ महानगरपालिका पुणे.

17-8-07
लिपिक
शिक्षण उपसंचालक कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर रोड,
पुणे विभाग, पुणे - १

२७/८/०७

9821

पंचायत समिती हवेली
जा.क्र/शिक्षण/221/२०२४
दि. २९/११/२०२४

मा. शिक्षणाधिकारी(प्राथ)
पुणे जिल्हा परिषद पुणे

विषय- सिद्धार्थ मोहोळ मेमोरियल स्कूल स्वमान्यता शिफारसी बाबत

महोदय,

उपरोक्त विषयानुसार सिद्धार्थ मोहोळ मेमोरियल स्कूल या शाळेचे स्व मान्यता तपासणी ऑनलाइन नोंदवताना सदर शाळेचा रिमार्क नजर चुकीने राहिला होता.

तरी सदर शाळेस सन २०१९ ते २२ व २०२२ ते २०२५ स्व मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

आपला विश्वासू,

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती हवेली

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, हवेली